Liabrary

17|2|17



VCD 17|2|17 F.Y.B.A SEM II A.T.K.T Feb.2017 Marathi 2½ Hrs Marks 75

सूचना : १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्रश्न १ ला. अ. गाळलेले शब्द भरा. (५)

१) इंद्रावती आला ______ वाहते आहे.
२) जगी भोगतात प्रीत ______ खरी.
३) निकुम्ब भावकवितेसाठी ______ ही संज्ञा योजतात.
४) 'जेथे जातो तेथे मी माझा ______.
५) द्यना एक पुरे ______.

ब. एका वाक्यात उत्तरे लिहा. (५)

१) सुरेश भट यांची कविता कशाला आवाहन करते?
२) जाहिरात म्हणजे काय?
३) 'जिप्सी' कवितेतून कोणती ओढ व्यक्त होते?
४) 'चाफ्याच्या झाडा' या कवितेतून कोणत्या नात्याचा शोध आहे?
५) इतिवृत्त लेखन म्हणजे काय?

क. जोड्या लावा. (५)

| | |
|---|---|
| १) प्रेम आणि मरण | अ) अनंत काणेकर |
| २) संसार | ब) भा. रा. तांबे |
| ३) रिकामे मधुघट | क) ना. धों. महानोर |
| ४) ह्या नभाने | ड) बहिणाबाई चौधरी |
| ५) रानगीत | इ) कवी गोविंदाग्रज |

प्रश्न २रा. अ. मानवी जीवनातील भयाण दुःख आणि निराशा (१५)
यांचा आविष्कार 'सत्य' कवितेतून झाला आहे, या विधानाचा परामर्श घ्या.

किंवा

"कवी केशवसुत यांना 'आधुनिक मराठी कवितेचे जनक' म्हणतात," विधान स्पष्ट करा.

प्रश्न: ३ रा मध्ययुगीन मराठी कवितेचा प्रवास तुमच्या शब्दात शब्दबद्ध करा.

किंवा

'प्रेम आणि मरण', 'रानगीत' या कवितांतून प्रेमानुभवाच्या विविध छटा कशा आविष्कृत झाल्या आहेत, ते सविस्तर लिहा.

प्रश्न: ४ था तुमच्या महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे इतिवृत्त तयार करा.

प्रश्न: ५ वा 'नवाकाळ' वृत्तपत्रासाठी 'लक्स' साबणाची जाहिरात तयार करा.

प्रश्न: ६ वा खालील मुद्द्यांच्या टिप्पणीलेखन करा.
'संजिवनी फार्मा' या कंपनीचे 'वेदनामुक्त' नावाच्या डोकेदुखीवरच्या गोळ्या बाजारात जास्त खपत नाही. याची पाहणी करण्याकरिता नेमलेल्या सर्वेक्षण समितीचे सदस्य या नात्याने 'विक्री विभागासाठी' या प्रकरणी सविस्तर टिप्पणी तयार करा.

प्रश्न: ७ वा पुढील उताऱ्याचे सारांशलेखन करा.
काही पुस्तकांचा केवळ स्वाद घ्यावयाचा असतो, तर इतर काहींचे ग्रहण करावयाचे असते. काही पुस्तके चघळून आत्मसात करावयाची असतात. म्हणजेच काही पुस्तकांचा केवळ काही भाग वाचावयाचा. इतर सर्व वाचावयाची असतात, परंतु जिज्ञासेशिवाय काही पुस्तके मात्र पूर्णपणे लक्षपूर्वक व व्यासंगपूर्णतेने वाचावयाची असतात.